आरटीईसाठी भाडेकरारांचा सुळसुळाट

आर्थिकदृष्ट्या सक्षम पालकांचाही डाव; गरजू विद्यार्थ्यांच्या हक्कावर गदा?

छत्रपती संभाजीनगर, ता. ११ : शिक्षणाचा मूलभूत हक्क मिळावा म्हणून लागू करण्यात आलेल्या आरटीईच्या २५ टक्के कोट्यावर आता संशयाची छाया पडू लागली आहे. नामांकित शाळांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी काही पालकांनी बनावट किंवा तात्पुरत्या भाडेकरारांचा आधार घेतल्याची चर्चा रंगू लागली आहे. दुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये अचानक वाढलेली भाडेकरारांची गर्दी आणि शाळेजवळ 'पत्ता' दाखवण्याची स्पर्धा पाहता, खऱ्या अर्थाने गरजू आणि वंचित विद्यार्थ्यांच्या हक्कावरच गदा येत असल्याची तीव्र भावना व्यक्त होत आहे.

आरटीई प्रवेशासाठी निवासाचा पुरावा म्हणून नोंदणीकृत भाडेकरार आवश्यक असल्याने सध्या शहरातील दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये पालकांची मोठी गर्दी होत आहे. अचानक वाढलेल्या अर्जांमुळे अनेक करार मंजुरीच्या प्रतीक्षेत पडून आहेत. केवळ छत्रपती संभाजीनगर शहरातच सुमारे पाचशेहून अधिक भाडेकरार प्रलंबित असल्याची माहिती समोर येत आहे. आरटीई नियमानुसार शाळेपासून तीन किलोमीटर अंतरातील विद्यार्थ्यांना प्रवेशात प्राधान्य दिले जाते. याच नियमाचा आधार घेत अनेक पालक संबंधित शाळेजवळ तात्पुरते किंवा बनावट भाडेकरार करत असल्याची चर्चा आहे.

गरजू विद्यार्थी वंचित राहण्याची भीती

■ **या सर्व प्रकारामुळे झोपडपट्टीत किंवा छोट्या घरात राहणाऱ्या गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना न्याय मिळेल का, हा प्रश्न उपस्थित होत आहे. खरोखरच त्या परिसरात राहणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज बाद होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे आरटीईच्या उद्देशालाच धक्का बसत असल्याची टीका होत आहे.**

व्यवस्थेतील पळवाटा शोधण्यासाठी आटापिटा

■ **आरटीईचा लाभ प्रामुख्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी असताना, काही सक्षम पालकही या व्यवस्थेतील पळवाटा शोधताना दिसत आहे. महागड्या खासगी शाळांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी बनावट पत्त्यांचा आधार घेतल्याने या योजनेचा मूळ उद्देशच धोक्यात येत आहे. प्रवेश प्रक्रियेची अंतिम मुदत १८ मार्च जवळ येत असल्याने पालकांमध्ये मोठी धांदल उडाली आहे. भाडेकरार नोंदणीसाठी कार्यालयांमध्ये रांगा लागल्या असून अनेक अर्ज मंजुरीच्या प्रतीक्षेत अडकले आहेत.**

'आम्ही खरोखर भाड्याने राहतो, पण आमच्याकडे कागदपत्रांची सोय करणे कठीण जाते. काही श्रीमंत लोक फक्त शाळेत प्रवेश मिळावा म्हणून बनावट भाडेकरार करतात, हे चुकीचे आहे. सरकारने कडक तपासणी केली नाही तर आमच्यासारख्या गरीबांच्या मुलांना आरटीईचा लाभ मिळणार नाही.'
- रवींद्र सोनटक्के, पालक, छत्रपती संभाजीनगर

विद्यमान अर्जातच करा बदल

छत्रपती संभाजीनगर : आरटीई अंतर्गत २५ टक्के राखीव जागांसाठी सुरू असलेल्या प्रवेश प्रक्रियेत घरापासून एक किलोमीटर अंतराच्या शाळेची अट रद्द करण्यात आल्याने पालकांना दिलासा मिळाला आहे. या बदलामुळे आधी अर्ज केलेल्या पालकांना पुन्हा नव्याने अर्ज करण्याची गरज नसून, विद्यमान अर्जातच आवश्यक ती दुरुस्ती करून शाळांचे पर्याय बदलता येणार असल्याचे प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांनी सांगितले.

आरटीई अंतर्गत विद्यार्थ्यांना खासगी स्वयंअर्थसहाय्यित व विनाअनुदानित शाळांमध्ये २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश देण्यासाठी सुरू असलेल्या ऑनलाइन नोंदणी प्रक्रियेला शालेय शिक्षण विभागाने आठ दिवसांची मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे पालकांना आता १८ मार्चपर्यंत अर्ज नोंदविता येणार आहे. आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी यंदा १७ फेब्रुवारी ते १० मार्चदरम्यान छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १२ हजार ५५२ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली आहे. मात्र, यावर्षी घरापासून एक किलोमीटर अंतराच्या शाळेची अट घालण्यात आल्यामुळे अनेक पालकांना अर्ज करताना अडचणी निर्माण झाल्या होत्या. या नियमाविरोधात नागपूर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली होती. न्यायालयाने हा नियम रद्दबातल ठरविल्यानंतर पालकांना दिलासा मिळाला.

लेट लतीफांना वेतनात दणका

छत्रपती संभाजीनगर, ता. ११ : कोणतेही शासकीय कार्यालय म्हटले की 'थोडं थांबा, नंतर या, करतो, बघतो' असे शब्द ऐकायला मिळतात. परंतु जिल्हाधिकारी कार्यालयात इतके शब्दही ऐकवायला अधिकारी, कर्मचारी नसल्याचे चित्र समोर आले. हे प्रकरण जिल्हाधिकाऱ्यांनी गंभीर घेत संबंधित सर्वच विभाग प्रमुखांना कारणे दाखवा नोटीस बजावत उशिरा येणाऱ्यांचे एक दिवस वेतन कपात करा, तसेच वरिष्ठांना न कळविता गैरहजर असणाऱ्या, उशिरा येणाऱ्यांना ताकीद देण्याचे आदेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ११ ते साडेअकरा दरम्यान कार्यालयात एकही अधिकारी, कर्मचारी उपस्थित नसल्याचा प्रकार समोर आल्यानंतर कार्यालयीन शिस्त भंग करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले. याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांना ४८ तासांत खुलासा सादर करण्याचेही आदेशात म्हटले आहे. उशिरा येणाऱ्या, गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या एक दिवसाच्या वेतनाची कपात करण्याचेही जिल्हाधिकारी स्वामी यांनी आदेशात म्हटले आहे.

अवतीभवती

संभाजीनगर एनसीसी ग्रुपला सर्वोच्च बहुमान; 'मुख्यमंत्री ध्वज' आणि 'चषक' प्रदान

एनसीसी संचालनालयातील 'सर्वोत्तम ग्रुप' म्हणून 'मुख्यमंत्री ध्वज', चषक अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल विवेक त्यागी यांच्या हस्ते स्वीकारताना ग्रुप कमांडर ब्रिगेडियर अनुप बबरि.

छत्रपती संभाजीनगर : एनसीसी ग्रुप मुख्यालय, छत्रपती संभाजीनगरने महाराष्ट्र एनसीसी संचालनालयातील 'सर्वोत्तम ग्रुप' म्हणून बहुमान पटकावत मानाचा 'मुख्यमंत्री ध्वज' आणि चषक आपल्या नावे केला आहे. मुख्यालयाची उत्कृष्ट कामगिरी, शिस्त, प्रशिक्षणातील नैपुण्य आणि युवा विकासातील योगदानाची दखल घेऊन हा गौरव करण्यात आला. छत्रपती संभाजीनगरचे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर अनुप जी. बबरि यांच्या नेतृत्वाखाली या ग्रुपने प्रजासत्ताक दिन शिबिर, निवड, वार्षिक प्रशिक्षण शिबिरे, स्वच्छ भारत अभियान, आपत्ती निवारण मदत आणि रक्तदान शिबिरांमध्ये उल्लेखनीय कार्य केले आहे. या यशाबद्दल एनसीसी संचालनालयाचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल विवेक त्यागी यांनी युनिट्सचे कौतुक केले.

'वाय.बी. चव्हाण'ला बेस्ट फार्मसी इन्स्टिट्यूट अवॉर्ड

छत्रपती संभाजीनगर : येथील वाय.बी. चव्हाण कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयाला सातारा येथे पार पडलेल्या 'महा-ॲप्टिकॉन-२०२६' परिषदेदरम्यान प्रतिष्ठित 'ॲप्टी-एमएस' डॉ. व्ही.आर. पाटील 'बेस्ट फार्मसी इन्स्टिट्यूट अवॉर्ड -२०२६' प्रदान केला. या वेळी महाविद्यालयाच्या वतीने समन्वयक डॉ. के.जी. बहेटी यांनी वरिष्ठ प्राध्यापकांसह हा पुरस्कार स्वीकारला. अलीकडेच युनिव्हर्सिटी ग्रँट कमिशनकडून या महाविद्यालयाला स्वायत्त दर्जा देखील प्रदान केला आहे.

शाळापूर्व तयारीसाठी आज शिक्षकांना प्रशिक्षण

छत्रपती संभाजीनगर : शाळेत पहिल्यांदाच पाऊल ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेची गोडी निर्माण व्हावी, त्यांनी नियमित शाळेत यावे, यासाठी काय-काय उपाययोजना करता येऊ शकतात. मुलांच्या आवडीनुसार शिकवण्याच्या पद्धतीत काय करायला हवे. यासाठी शिक्षकांची तयारी करण्याकरिता गुरुवारी (ता. १२) शिक्षकांचे ऑनलाइन प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. यात एक हजार शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे.

पाठपुराव्याने साळी कुटुंबाला निवृत्तिवेतन मंजूर

छत्रपती संभाजीनगर : घृष्णेश्वर हायस्कूलचे शिक्षक हेमंतकुमार साळी यांचे चार सप्टेंबर २०२५ रोजी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले होते. शिक्षक परिषदेचे राज्याध्यक्ष गणेश पवार यांनी संस्था, जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग व नागपूर येथील कार्यालयाशी पाठपुरावा करून साळी कुटुंबाला कुटुंब निवृत्तिवेतन मंजूर करून घेतले. यासाठी शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर, उपशिक्षणाधिकारी शेवलीकर व पेन्शन विभागाचे वरिष्ठ अधिकारी म्हस्के यांनी सहकार्य केले. याबद्दल शिक्षक परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षण विभागाचे आभार मानले.

डॉ. संतोष मोकळे यांना राज्यस्तरीय पुरस्कार

डॉ. संतोष मोकळे

छत्रपती संभाजीनगर : येथील वाय.बी. चव्हाण कॉलेज ऑफ फार्मसीमधील फार्मास्युटिकल केमिस्ट्री विभागाचे प्राध्यापक डॉ. संतोष एन. मोकळे यांना महा-ॲप्टीकॉन २०२६ परिषदेदरम्यान प्रतिष्ठित ॲप्टी-एमएस डॉ. पी.डी. पाटील बेस्ट फार्मास्युटिकल्स सायंटिस्ट अवॉर्ड प्रदान करण्यात आला. ही परिषद असोसिएशन ऑफ फार्मासिटिकल टीचर्स ऑफ इंडिया (ॲप्टी) महाराष्ट्र राज्य शाखेतर्फे सातारा येथे पार पडली. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.एच. देहगण तसेच संस्थेच्या व्यवस्थापनाने डॉ. मोकळे यांचे अभिनंदन केले.

नागसेनवन : महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या प्रतिमेला अभिवादन करताना शिक्षक व विद्यार्थी.

महाराजा सयाजीराव गायकवाड जयंती साजरी

नागसेनवन : मिलिंद मल्टीपर्पज हायस्कूलमध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड जयंतीनिमित्त प्रतिमेला मुख्याध्यापक धन्यकुमार टिळक यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. टिळक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उच्च शिक्षणासाठी सयाजीराव गायकवाड यांनी केलेल्या मदतीचा तसेच संस्थानात प्राथमिक शिक्षणासाठी केलेल्या कायद्यांचा उल्लेख करत त्यांच्या जनहितकारी कार्याची माहिती दिली. प्रास्ताविक हेमंत गायकवाड यांनी केले. रोहिणी राजभोज व लता श्रीनाथे यांनी सयाजीराव गायकवाड यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. सूत्रसंचालन श्रेया गवई, आभार आरुषी वाहुळकर यांनी मानले. कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

इस्रो सहल; जिल्हास्तरीय निवड चाचणी आज

परीक्षा बळिराम पाटील हायस्कूलमध्ये होणार

छत्रपती संभाजीनगर, ता. ११ : जिल्हा परिषदेच्या शाळांमधील इयत्ता पाचवी ते आठवीतील गुणवंत विद्यार्थ्यांना अंतराळ विज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या इस्रो सहलीसाठी जिल्हास्तरीय निवड चाचणी गुरुवारी (ता.१२) घेण्यात येणार आहे. तालुका स्तरावर झालेल्या चाचणीतून प्रत्येक तालुक्यातील पहिल्या दहा गुणवंत विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय चाचणी परीक्षा सिडको एन-९ येथील बळिराम पाटील हायस्कूलमध्ये होणार आहे.

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या चाचणीतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथे उपग्रह प्रक्षेपणाचा प्रत्यक्ष अनुभव देण्यासह केरळमधील थुंबा स्पेस म्युझियम तसेच बंगळूर येथील विश्वेश्वरय्या इंडस्ट्रियल ॲण्ड टेक्निकल म्युझियमला शैक्षणिक सहल आयोजित केली जाणार आहे.

शिक्षण पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांना विज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, हा उपक्रमाचा उद्देश आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही अंतराळ संशोधनाची ओळख व्हावी, त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन, जिज्ञासा वाढावी, यासाठी इस्रो सहल उपयुक्त ठरणार आहे.
- जयश्री चव्हाण,
शिक्षणाधिकारी, प्राथमिक विभाग

विज्ञान, अंतराळ संशोधन आणि तंत्रज्ञानाविषयी विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा निर्माण व्हावी हा उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या अनुषंगाने जिल्हास्तरीय निवड चाचणी गुरुवारी सकाळी ११ ते १ या वेळेत बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या स्वरूपात ७५ गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यानंतर दुपारी २ ते ५ वेळेत २५ गुणांची प्रात्यक्षिक परीक्षा होणार आहे. त्यामध्ये गणित प्रात्यक्षिक १० गुण, विज्ञान प्रात्यक्षिक १० गुण, तोंडी परीक्षा ५ गुणांची असणार आहे.

झेडपी अध्यक्ष, उपाध्यक्षांची बुधवारी निवड

छत्रपती संभाजीनगर, ता. ११ : पंचायत समित्यांच्या सभापतींची निवड १० मार्चला झाली. आता जिल्हा परिषद अध्यक्षांच्या निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अध्यक्षांची निवड बुधवारी (ता.१८) दुपारी दोनला होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिली.

की पीठासीन अधिकारी म्हणून अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे यांची निवड केल्याचेही त्यांनी सांगितले. अध्यक्षपदासाठी नामांकनपत्र सभेच्या वेळेपूर्वी म्हणजेच सकाळी १० ते १२ या वेळेत स्वीकारले जातील. दुपारी दोन वाजता प्रत्यक्ष सभेला सुरवात होईल. प्रथम प्राप्त नामनिर्देश पत्राची छाननी त्यानंतर नामनिर्देशन पत्र माघारीसाठी वेळ दिला जाईल. त्यानंतर निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची यादी (मराठी वर्णाक्षर क्रमानुसार) तयार करण्यात येईल. त्यानंतर प्रथम अध्यक्षपदासाठी व नंतर उपाध्यक्षपदासाठी एका पेक्षा जास्त उमेदवार असतील तर हात वर करून मतदान घेण्यात येईल. हात वर करून मतदान करणाऱ्या सदस्यांची स्वाक्षरी घेऊन नोंद घेणार आहे, अशी माहिती पीठासीन अधिकारी, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुने यांनी दिली.

पॅट चाचणीत विद्यार्थी उपस्थितीवरच पटसंख्या ग्राह्य

११, १५, २२ एप्रिलला घेण्याचे नियोजन; मार्चअखेर पॅट-३ घेण्याची मागणी

छत्रपती संभाजीनगर, ता. ११ : इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी होणाऱ्या संकलित मूल्यमापन चाचण्यांमुळे शाळांमध्ये परीक्षा तयारीची लगबग सुरू झाली आहे. ११, १५ व २२ एप्रिलला 'पॅट-२' चाचण्या घेण्याचे वेळापत्रक जाहीर केले आहे. या दिवशी उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांनाच संबंधित शाळेची पटसंख्या मानली जाणार असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे मुख्याध्यापक आणि शिक्षकांवर विद्यार्थ्यांची पूर्ण उपस्थिती सुनिश्चित करण्याची जबाबदारी आली आहे. दुसरीकडे एप्रिलमधील वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर 'पॅट-३' चाचण्या मार्चअखेर घेण्याची मागणी शिक्षक संघटनांनी प्रशासनाकडे केली आहे.

शिक्षण विभागाने इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी संकलित मूल्यमापन चाचणी-२ ११ एप्रिलला पहिली भाषा मराठी, १५ एप्रिलला गणित आणि २२ एप्रिलला इंग्रजी (तिसरी भाषा) या विषयांचे पेपर होतील. या तीनही विषयांचे प्रश्नपत्र संच राज्य स्तरावरून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. पॅट चाचणीसाठी उपस्थित असलेले विद्यार्थीच संबंधित शाळेची पटसंख्या मानली जाणार असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

इतर विषयांचे पेपर शाळांच्या सोयीने

■ **उर्वरित विषयांच्या चाचण्या ११ ते २२ एप्रिल या कालावधीत, परंतु मुख्य तारखा वगळून, शाळांच्या सोयीप्रमाणे घेता येणार आहेत. परीक्षा झाल्यानंतर सर्व प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका शाळांनी जतन करून ठेवाव्या लागणार आहेत.**

उष्णतेमुळे पॅट-३ मार्चअखेर घेण्याची मागणी

■ **एप्रिल महिन्यात तापमान ४० अंशांच्या पुढे जाण्याची शक्यता असून विद्यार्थी व शिक्षकांना उष्णतेचा फटका बसू नाही म्हणून पॅट-३ चाचण्या मार्चअखेर घ्याव्यात, अशी मागणी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेने शिक्षण आयुक्तांकडे केली आहे.**

पाचवी व आठवीसाठी ढकलपास बंद

■ **इयत्ता पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांना ढकलपास देण्याची पद्धत बंद केली आहे. या परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना जून महिन्यात पुनर्परीक्षा द्यावी लागते. त्याआधी संबंधित विषय शिक्षकांनी अतिरिक्त अध्यापन व मूल्यमापन करून विद्यार्थ्यांना सक्षम करणे अपेक्षित आहे.**

अधिकाऱ्यांच्या अचानक भेटी

■ **पॅट-२ चाचण्या सुरू असताना शिक्षणाधिकारी व इतर वरिष्ठ अधिकारी विविध शाळांना अचानक भेटी देणार आहेत. शिक्षकांनी उत्तरपत्रिका कशा तपासल्या, गुणांकन पारदर्शकपणे झाले का, परीक्षा झाल्यानंतर काही फेरफार झाले आहेत का, याची तपासणी उत्तरपत्रिकांच्या आधारे केली जाणार आहे.**

मूल्यमापनाचा उद्देश

■ **विद्यार्थ्यांची अध्ययन निष्पत्ती तपासणे, राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणात कामगिरी सुधारण्यासाठी आवश्यक नियोजन करणे तसेच अध्ययनात मागे असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सुधारात्मक अध्यापनाची दिशा ठरवणे हा या चाचण्यांचा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे परीक्षा पारदर्शकपणे घेण्याच्या सूचना शिक्षण विभागाने दिल्या आहेत.**

पंजाब नैशनल बैंक (भारत सरकारचा उपक्रम) pnb punjab national bank (A Govt. of India Undertaking)

एआरएमबी, नाशिक
शॉप नं.2 व 3 मेझनाईन मजला, स्नेह हाईट अपार्टमेंट, इंदिरा नगर, नाशिक - 422009. फोन : 0253- 2323020, ईमेल- cs8288@pnb.bank.in

सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8 व 9 अन्वये तमाम लोकांकरीता ई-लिलाव विक्री नोटीस

स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री करण्याकरीता ई-लिलाव विक्री नोटीस
(सरफेसी कायदा, 2002 मधील नियम 8(6) अन्वये वैधानिक विक्री नोटीस)

सेक्युरिआयझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट ॲन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट 2002 कलम 13 (4) अंतर्गत मधील नियम 8(6), सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या अन्वये स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री ई- लिलाव पध्दतीने करण्या संदर्भात

तमाम लोकांस व विशेषतः कर्जदार व हमीदार ज्यांचे वर्णन खालील तक्तामध्ये केले आहे त्यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद स्थावर/ अस्थावर मिळकती ज्या सेक्युअर्ड क्रेडीटर यांचेकडे गहाण / ताब्यामध्ये आहेत, ज्याचा रचनात्मक / प्रत्यक्ष / प्रतिकात्मक ताबा अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर यांनी घेतला आहे. अधिकृत अधिकारी, त्यांची विक्री **"जसे आहे तसे", "जिथे आहे तिथे" व "जशी आहे" त्या स्थितीत" खालील तारखेस** कर्जदार/ गहाणदार / हमीदार यांचेकडून देय रक्कम वसूल करण्याकरीता, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर, यांचेद्वारे करण्यात येणार आहे. राखीव किंमत व अनामत रक्कम व स्थावर मिळकतीचे किमान वर्णन व त्यावर असलेला बोजा (काही असल्यास) यांची माहिती खालीलप्रमाणे

लॉट क्र.	शाखेचे नाव खात्याचे नाव कर्जदार / जामीनदाराचे नाव आणि पत्ता	मिळकतीचे वर्णन आणि कर्जदार / गहाणदार यांची नावे	अ) मागणी सूचनाकलम १३(२) प्रमाणे दिनांक ब) थकबाकी रक्कम दि. --------- रोजी क) ताबा दिनांक कलम १३(४) सरफेसी कलम २००२ प्रमाणे अ) ताबा प्रकार सांकेतिक / प्रत्यक्ष /रचनात्मक	अ) अनामत रक्कम (रु. लाख) ब) ईएमडी (ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख) क) बोली वाढीव रक्कम	लिलावाचे दिनांक व वेळ	कर्जदारांच्या बोझाचा तपशील
१	**पीएनबी- समर्थ नगर (०७०९१०)** **कर्जदार:** **मेसर्स एमएम ट्रेडर्स** पत्ता: पहिला मजला, अलंकार हॉटेल व्हीआयपी रोडच्या बाजूला, ज्युबिली पार्क, औरंगाबाद-४३१००१. **प्रोप्रायटर:** **श्री. मोहम्मद मेहसानुद्दीन मुनीरुद्दीन** पत्ता: प्लॉट क्रमांक ४०/ए, सीटीएस क्रमांक ११४३२, गुलशन-ए उस्मान शाळेसमोर, चट्टाबाग,, आलमगीर, औरंगाबाद-४३१००१ **तसेच राहणार** पत्ता: फ्लॅट क्रमांक ०८, औरंगाबाद ट्रेड सेंटर, गट क्रमांक १०४//भाग, मिटमिटा, पाडेगाव ता.क आणि जिल्हा. औरंगाबाद-४३१००२ **तसेच राहणार** फ्लॅट क्रमांक १०, औरंगाबाद ट्रेड सेंटर, गट क्रमांक १०४/पी मिटमिटा, पाडेगाव ता. आणि जिल्हा. औरंगाबाद-४३१००२	प्लॉट नं. ३७ क्षेत्रफळ ६० स्क्वे.मी., प्लॉट नं. ३८ क्षेत्रफळ ६० स्क्वे.मी., प्लॉट नं. ३९ क्षेत्रफळ ६० स्क्वे.मी., प्लॉट नं. ४० क्षेत्रफळ ७८ स्क्वे.मी., एकुण २५८.०० स्क्वे.मी. गट नं. १८४, मौजे अनंतपुर (हर्सुल) ता. गंगापूर, जि. छ. संभाजीनगर **चतुःर्सिमा -** **उत्तर -** प्लॉट नं. ३६, **दक्षिण -** रस्ता, **पुर्व -** प्लॉट नं. २५,२६,२७ आणि २८ **पश्चिम -** ९ मी. रस्ता **मालमत्ता आयडी-PUNBAW261616706**	अ) ०८.०७.२०२५ ब) रु. ४२,११,५११/- दि. ३१.१२.२०२५ रोजी अधिक व्याज आणि खर्च क) २२.०९.२०२५ ड) सांकेतिक ताबा	अ) रु. २२.२३ लाख ब) रु. २.२२३ लाख (२७.०३.२०२६) क) रु. ०.२५ लाख	दि. २७.०३.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत	माहित नाही
२	**पीएनबी- समर्थ नगर (070910)** **कर्जदार:** **मोहम्मद मेहसानुद्दीन मुनीरद्दीन** पत्ता: प्लॉट नं.40/ए, सीटीएस नं.11432, गुलशन-ए उस्मान शाळेसमोर, चट्टाबाग, आलमगीर, औरंगाबाद-431001 **सह-कर्जदार:** **श्रीमती फरहीन बेगम मोहम्मद मेहसानुद्दीन इनामदार** पत्ता: प्लॉट नं. ४०/ए, सिटीएस नं. ११४३२, गुलशन-ए उस्मान शाळेसमोर, चट्टाबाग, आलमगीर, औरंगाबाद-431001. **तसेच राहणार** फ्लॅट नं.08, औरंगाबाद ट्रेड सेंटर, गट नंबर 104/भाग, मिटमिटा, पडेगाव ता. आणि जि. औरंगाबाद-431002. **तसेच राहणार** फ्लॅट क्रमांक १०, औरंगाबाद ट्रेड सेंटर, गट क्रमांक १०४/भाग, मिटमिटा, पाडेगाव तालुका आणि जिल्हा. औरंगाबाद-४३१००२	१. फ्लॅट नं. १०, क्षेत्रफळ ५५.०४ स्क्वे.मी., तिसरा मजला, औरंगाबाद ट्रेड सेंटर, गट नं. १०४ भाग, मौजे मिटमिटा ता.जि. छ. संभाजीनगर **चतुःर्सिमा -** **उत्तर-**फ्लॅट क्रमांक ११ **दक्षिण-**रस्ता **पूर्व-**रस्ता. **पश्चिम-**फ्लॅट क्रमांक ०९. मालमत्ता आयडी- **PUNBAW259857848.** २. फ्लॅट नं. ८, क्षेत्रफळ ५६.२९ स्क्वे.मी., दुसरा मजला, औरंगाबाद ट्रेड सेंटर, गट नं. १०४ भाग, मौजे मिटमिटा ता.जि. छ. संभाजीनगर **चतुःर्सिमा -** **उत्तर-**फ्लॅट क्रमांक १८ **दक्षिण-**जिना **पूर्व-**फ्लॅट क्रमांक ०७. **पश्चिम-**पॅसेज **मालमत्ता आयडी- PUNBAW259857900**	अ) ०८.०७.२०२५ ब) रु. ५६,२४,२२२.३९/- दि. ३१.१२.२०२५ रोजी अधिक व्याज आणि खर्च क) २२.०९.२०२५ ड) सांकेतिक ताबा	अ) रु. २३.९९ लाख ब) रु. २.३९९ लाख (२७.०३.२०२६) क) रु. ०.२५ लाख अ) रु. २४.५४ लाख ब) रु. २.४५४ लाख (२७.०३.२०२६) क) रु. १.०० लाख	दि. २७.०३.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत	माहित नाही
३	**शाखा- समर्थ नगर औरंगाबाद (०७०९१०)** **कर्जदार -** **श्री. शेख अशफाक शेख मुख्तार** पत्ता - फ्लॅट नं. ए-१५, स्टिल्ट मजला, ए विंग, नरहरी घृष्णेश्वर, गट नं. १५४ भाग, देवगिरी व्हॅली मागे, एकलव्य फाऊंडेशन जवळ, सायली चॅरीटेबल ट्रस्ट कॉलेज ऑफ फारमसी मागे, समर्थनगर जवळ, मिटमिटा गाव, ता.जि. औरंगाबाद- ४३१ ००१ **सहकर्जदार -श्रीमती समिना बेगम अशफाक शेख,** पत्ता - फ्लॅट नं. ए-१५, स्टिल्ट मजला, ए विंग, नरहरी घृष्णेश्वर, गट नं. १५४ भाग, देवगिरी व्हॅली मागे, एकलव्य फाऊंडेशन जवळ, सायली चॅरीटेबल ट्रस्ट कॉलेज ऑफ फारमसी मागे, समर्थनगर जवळ, मिटमिटा गाव, ता.जि. औरंगाबाद- ४३१ ००१	फ्लॅट नं. ए-१५, स्टिल्ट मजला, ए विंग, नरहरी घृष्णेश्वर, गट नं. १५४ भाग, देवगिरी व्हॅली मागे, एकलव्य फाऊंडेशन जवळ, सायली चॅरीटेबल ट्रस्ट कॉलेज ऑफ फारमसी मागे, समर्थनगर जवळ, मिटमिटा गाव, ता.जि. औरंगाबाद- ४३१ ००१ **चतुःर्सिमा -** **पुर्व -**जिना **पश्चिम -** विंग बी **उत्तर -** बालकनी **दक्षिण -** जिना आणि फ्लॅट नं. ए-१४ Property ID-**PUNB000828800183**	अ) ३०.०४.२०२२ ब) रु. ४१,४३,५३४.८८/- दि. ३१.१२.२०२५ रोजी + इतर व्याज क) २५.०८.२०२२ ड) प्रात्यक्षिक ताबा	अ) रु. १७.८९ लाख ब) रु. १.७८९ लाख (दि. २७.०३.२०२६) क) रु. ०.२५ लाख	दि. २७.०३.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत	माहित नाही
४	**शाखा : सिडको, औरंगाबाद (०९८१००)** **कर्जदार-** **श्रीमती अमरीन बेगम शेख मोहम्मद नूर** **श्री. शेख मोहम्मद नूर यांची पत्नी** पत्ता: फ्लॅट नं. बी-०९, दुसरा मजला, नरहरी घृष्णेश्वर सोसायटी, गट क्र. १५४/भाग, मिटमिटा ता. जि. औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१००१	फ्लॅट क्रमांक बी-०९, दुसरा मजला, नरहरी घृष्णेश्वर सोसायटी, गट क्रमांक १५४ / भाग, मिटमिटा, ता. आणि जिल्हा औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१००१. **मालकी हक्क श्रीमती अमरीन बेगम शेख मोहम्मद नूर** **चतुःर्सिमा -** **पूर्व-**रस्ता आणि जिना **पश्चिम-** मोकळा भाग **उत्तर-**फ्लॅट क्रमांक बी-१० **दक्षिण:-**ए-विंग. **प्रॉपर्टी आयडी-PUNB000828800220**	अ) २०.०३.२०२३ ब) रु. ३०,९८,३३६.३३/- दि. ३१.१२.२०२५ रोजी + इतर व्याज क) ०१.११.२०२३ ड) प्रात्यक्षिक ताबा	अ) रु. १५.९२ लाख ब) रु. १.५९२ लाख (दि. २७.०३.२०२६) क) रु. ०.२५ लाख	दि. २७.०३.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत	माहित नाही

विक्री ही सेक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या विहित केलेल्या अटी व शर्ती खालील प्रमाणे
1. मालमत्तेची विक्री जशी आहे तशी आणि जशी आहे तशी आणि जे काही आहे ते आहे वर विक्री केली जात आहे.
2. खाली नमूद सुरक्षीत मालमत्तेची माहिती ही अधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहितीनुसार नमूद केली आहे, परंतू अधिकृत अधिकारी हे त्यामध्ये असलेल्या कोणत्याही तृटीस, चुकीची माहितीस वा काही चु